# प्रेसनोट

दिनांक– २८/०९/२०१८.

## अंधेरी, मुंबई येथील वनपाल यांच्याविरूध्द अपसंपदा बाळगल्यावरून गुन्हा दाखल

दिनांक २७/०९/२०१८ रोजी अंधेरी, मुंबई येथील वनपाल **महादेव नाथा शिंगाडे**, यांच्याविरुध्द चालु असलेल्या मालमत्तेच्या उघड चौकशीमध्ये त्यांनी अपसंपदा संपादीत केल्याचे निष्पन्न झाल्यावरून त्यांचेविरुध्द शासकीय सेवेत असताना संपादित केलेल्या अपसंपदेवरुन विरार पोलीस स्टेशन, पालघर येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे, त्याबाबत थोडक्यात हकिकत खालील प्रमाणे.

यातील लोकसेवक, **महादेव नाथा शिंगाडे** यांनी सन २००७ ते ५ फेब्रुवारी २०१५ या कालावधीत शासकीय सेवेत असताना, त्यांनी त्यांच्या सर्व ज्ञात व कायदेशीर मार्गाने मिळणाऱ्या उत्पन्नापेक्षा रक्कम रुपये १५,६०,३७५/- एवढया रकमेची अपसंपदा संपादीत केल्याचे निष्पन्न झाल्यावरून पोउपअधी. श्री. वाल्मीक पाटील यांनी दिलेल्या फिर्यादीवरून वरील नमुद लोकसेवक यांच्याविरुध्द् दिनांक २७/०९/२०१८ रोजी विरार पोलीस स्टेशन, पालघर येथे भ्रष्टाचार प्रतिबंधक (संशोधन) कायदा २०१८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उप अधीक्षक श्रीमती निलीमा कुलकर्णी, असीबी, ठाणे हे करत असून, त्यांचा संपर्क क्र. (८१०८८००५७९) असा आहे.

**शासकीय लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत ॲन्टी करप्शन ब्युरो, ठाणे कार्यालयास खालील दुरध्वनी क्रमांकावर संपर्क करावा.**

---

१) टोल फ्री क्र. :- **1064**
२) दुरध्वनी क्रमांक :- **022–25427979**
३) ई-मेल आयडी :- **spacbthane@mahapolice.gov.in**
४) वेबसाईट :- **www.acbmaharashra.gov.in**

Scanned by CamScanner